# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- ०३/०३/२०१८

## गडचिरोली पोलीस दलामार्फत साकारले गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

मा. प्रभारी पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. महेश्वर रेड्डी सो. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील मैदानावर पोलीस दल गडचिरोली च्या नावाने एक अतिशय आगळेवेगळे रेकॉर्ड नोंदविले गेले असून गडचिरोली जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील ७००० नागरिक एकत्र येवून आदर्श मित्र मंडळ पुणे येथील उदय जगताप यांनी अहिंसा व शांततेचा संदेश देनारे गांधी विचार व अहिंसा या पुस्तकाचे वाचन केले व गडचिरोली जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील ७००० नागरिक एकत्र येत त्याचे श्रवण करून या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार झाले.

सकाळी १०.०० वा. मा. केंद्रिय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर सो. यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. यावेळी नागरिकांना कार्यक्रमाचे स्थळी ३ प्रवेशव्दार उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच नागरिकांची नोंदणी बारकोड पध्दतीने करण्यात येत होती. यामुळे प्रत्येक नागरिकांला मोजले जात होते. ७००० नागरिक १ वा. दरम्यान मैदानावर आले आणि या जागतिक विक्रमास सुरूवात झाली. मा. प्रभारी पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. महेश्वर रेड्डी सो. यांनी कार्यक्रमाचे सुरूवातीला मनोगत व्यक्त करताना सांगितले की, गडचिरोली पोलीस दल हे जगाला शांतता व अहिंसा याचा संदेश देऊ इच्छित असून यामुळे गडचिरोली जिल्हयाचे नाव जगाच्या नकाशावर शांततेचा संदेश देनारा जिल्हा अशी होणार. यानंतर उदय जगताप यांनी अहिंसा व शांततेचा संदेश देणारे गांधी विचार व अहिंसा या पुस्तकाचे सुमारे २०

मि. वाचन केले यामध्ये जगातील महान व्यक्ती, साधूसंत, धर्मगुरू यांचे विचारांचा समावेश होता. सर्व जाती धर्म यांना यात स्थान देण्यात आले होते.

मा. केंद्रिय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर सा ो. यांनी गडचिरोली पोलीस दलाचे याप्रसंगी अभिनंदन करून या कार्यक्रमामुळे गडचिरोलीचा एक वेगळा ठसा जगाच्या उमटवला गेल्याचे त्यांनी म्हटले. यावेळी या कार्यक्रमात आदिवासी समाजाचे दैवत असलेल्या बिरसा मुंडा यांचे नातु सुखराम मुंडा, बुधराम मुंडा हे सहभागी झालेले होते त्यांचा मा. गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मा. खासदार गडचिरोली अशोक नेते, मा. आमदार गडचिरोली डॉ. देवराव होळी, जिल्हा परिषद गडचिरोली अध्यक्षा सौ. भांडेकर, नगरपरिषद अध्यक्षा सौ. पिपरे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे साक्षीदार म्हणून गडचिरोली जिल्हयाचे जिल्हाधिकारी मा. शेखर सिंग व सहाय्य जिल्हाधिकारी मा. सचिन ओंबासे सो. हे उपस्थित होते. पोलीस दलातर्फे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. अपर पोलीस अधिक्षक अहेरी श्री. राजासामी, मा. अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. हरी बालाजी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस विभागाने विशेष मेहनत घेतली.

